# मेट्रोपॉलिटन मॅजिस्ट्रेट, ५३ वे कोर्ट, मुलुंड, मुंबई यांचे समक्ष

(केस क्र. 30/SW/२०१६)

(1) मी श्री.नितीन बजरंग चव्हाण, वय ४० वर्षे, पत्ता- ए.एम.जैन इस्टेट, ५/४९, व्हिलेज रोड, भांडूप (प.) , मुंबई -४०००७८, माझा व्यवसाय - होम अप्लायंस मेंटेनेंस असा आहे. मी शपथेवर पुढीलप्रमाणे कथन करतो-

मी पूर्वीपासूनच सामाजिक व नैतिक विचाराचा व्यक्ती असल्याने समाजकार्य, वृतपत्रात लेखन इ. कार्ये करत आलेलो आहे. या देशावर, मुंबईवर २६/११/२००८ रोजी अतिरेकी हल्ला झाला तेव्हा मृत व शहीदांचा मान राखणेसाठी मी विभागात ३१ डिसेंबरला पार्टी न करणेचा संदेश देणारे बॅनर्स लावणे इतका मी संवेदनशील दक्ष नागरीकांचे कार्य केलेले आहे. सध्या मी नागरीक स्वराज मंच, वनशक्ती, भ्रष्टाचाराविरोधी जनजागृती अभियान इ. नोंदणीकृत सामाजिक संस्थांशी संलग्न असून त्याद्वारे पर्यावरण, नागरी, मानवी हक्क इ. विषयात समाजकार्य करत आहे.

(2) या मा. कोर्टात केलेल्या नमुद तक्रारीनुसार माझे म्हणणे असे कि, सन २०११ च्या सुरूवातीला TM-Anna TD - Anna, IAC-MUM या अरविंद केजरीवाल व इतर संयोजित SMS पोर्टलहून मला जनलोकपाल आंदोलनाचा हिस्सा बनणेसाठी SMS येवू लागले. त्यामुळे एप्रिल २०११ पासून मी नानावटी हॉल, विलेपार्ले, मुंबई येथे होणा-या अरविंद केजरीवाल संयोजित इंडिया अगेन्स्ट करप्शनच्या मिटींगमध्ये हिस्सा बनू लागलो. या मिटींग्ज श्री. मयांक गांधी, प्रफुल वोरा इ. हे लोक आयोजित करायचे. त्यावेळी टी.व्ही .प्रसार माध्यमं द्वारे अरविंद केजरीवाल तसेच नानावटी हॉल येथे होणा-या मिटींगजमध्ये मयांक गांधी हे आपल्या सार्वजनिक भाषणांतुन जनलोकपाल आंदोलन ही आझादीची दुसरी जंग आहे, आम्ही यातून राजकीय पक्ष काढणार नाही, हे भ्रष्टाचारविरोधी आंदोलन सिव्हील सोसायटीच्या रूपातच राहील अशी वारंवार ग्वाही दिल्याने व या आंदोलनाला श्री. अण्णा हजारेंचे नेतृत्व असल्याने मी इतिहास व देशभक्तीसाठी या राष्ट्रव्यापी आंदोलनाचा विनामुल्य प्रचारक झालो.

(34)



(3) त्यानुसार विभागात जनजागृतीसाठी स्वखर्चाने पत्रके वाटणे, साप्ताहिक मिटींग घेणे इ. कार्ये करत होतो. मी अनेक कार्यक्रमं घेऊन सुमारे १० ते १५ हजार [illegible] नागरिकांचा [illegible] माझ्या तेव्हाच्या आंदोलनातील IAC च्या वरिष्ठांना दिला [illegible]. तेव्हा वरिष्ठ असलेले मयांक गांधी, प्रफुल वोरा यांनी मला इंडिया अगेन्स्ट [illegible] ( नागरिक समिती) चे लेटरहेड देवून विभागातील जनतेच्या समस्या सोडवणेस [illegible] भ्रष्टाचाराशी लढणेसाठी सांगितले होते.

(4) माझेवर झालेल्या षडयंत्री अत्याचाराची पार्श्वभूमी अशी की, माझेसोबत त्यावेळी IAC नागरिक समितीमध्ये कार्य करणारे माझे सहकारी श्री. बाळकृष्ण मांजलकर [illegible] तुळशीपाडा, भांडूप, मुंबई हे त्यांचे विभागातील भुमाफीया विरूध्द सनदशिररित्या लढत होते. तेव्हा मी त्यांचे कामात पुर्ण साथ दिली. त्यामुळे भुमाफीया व त्यांना वाचवणारे भ्रष्ट अधिकारी यांचे विरोधातील बातम्या दै. लोकमतमध्ये छापून येत होत्या. या गोष्टींमुळे कदाचित काही भ्रष्ट पोलिसांचा मांजलकरांसह माझ्यावर राग होता.

(5) याव्यतिरिक्त दुस-या बाजुला, आमचे आणखी एक सहकारी श्री. हमीद सरवैया याने शास्त्रीनगर , भांडूप , मुंबई या आपल्या राहत्या विभागात झेंडावदंनाच्या स्तंभाचे भोवती काही भुमाफीयांद्वारे सिमेंटच्या गोण्या रचल्याच्या व ती जागा बळकवयाचा कट असल्याच्या मुद्दा आमच्या IAC च्या दि. ८/१/१२ रोजीच्या मिटींगमध्ये मांडला. तेव्हा मिटींगमध्ये एकमत झाले की यावर सनदशीररित्या तोडगा काढला जावा. ठरल्यानुसार श्री. हमीद सरवैया यांच्या नावाने व आम्हाला मयांक गांधी, प्रफल वोरा यांनी दिलेल्या IAC नागरिक समितीच्या लेटरहेडवरून "एस वॉर्ड" व भांडूप पोलिस स्टेशनला सदर सिमेंटच्या गोण्या हटविण्यासाठी निवेदने दिली सदर निवेदनांची प्रत ही मयांक गांधी, प्रफुल वोरांनाही दाखवणेत आली व त्यांनी प्रोत्साहनही दिले. त्या निवेदनाचा कठोरपणे पाठपुरावा केल्यानंतर सदर सिमेंटच्या गोण्या हटविण्यात आल्या. त्यानंतर आम्ही IAC चे सदस्यांनी स्थानिय मान्यवरांसह २६ जाने २०१२ रोजी तेथे झेंडावंदन केला. त्यामुळे ती जागा बळकविण्याचा कट अयशस्वी झाला याचा तथाकथित भुमाफीया - राजेश अमिन, संकेत जोशी, कार्ल डिसूझा इ. चा माझेवर व हमीद सरवैयावर राग होता.

(35)



(6) तसेच या घटनेदरम्यान त्या विभागातील सुमारे १५ ते १७ नागरिकांच्या स्वाक्षरी असलेल्या व IAC चे नावे दिलेल्या निवेदनानुसार असे समझले कि नमुद तथाकथीत भुमाफीया हे राजकारणी, नगरसेवक, भ्रष्ट पोलिस व पालिका अधिकारी यांचे भागीदारीने विभागात अशी दहशत राबवतात कि, कोणीही चाळक-याने आपल्या घराचे कोणतेही बांधकाम हे त्या भुमाफीयांनाच दयायचे. या पर्याया व्यतिरिक्त कोणीही बांधकाम केले तर ते पालिकेकडून तोडले जायचे व या भुमाफीयांचे विरोधात तक्रार करणा-या तक्रारदाराला खोट्या पोलिस केसमध्ये अडकवून त्रस्त व विडंबित केले जायचे. सदर समाजद्रोही प्रकार कायदेशिररित्या रोखणेहेतु माझी मयांक गांधी, प्रफल वोरा यांचेशी चर्चा झाल्या व त्यानुसार श्री. हमीद सखैया व IAC चे अजून एक सदस्य श्री.राजा जोसेफ, वय ३५ वर्षे यांनी सदर भुमाफियांच्या अतिक्रमण व बेकायदेशिर बांधकामाविरूध्द "एस" वॉर्डमध्ये फेब्रुवारी २०१२ मध्ये निवेदन दिली. त्यांनंतर श्री. सरवैया यांच्या कुटुबियांना भुमाफियांकडून धमकी मिळाली, ज्याची तक्रार भांडूप पोलिस व पोलिस उपायुक्त याकडे केली गेली, ज्यावर विरोधीविरूध्द काहीच कारवाई करणेत आली नाही. तसेच RTI द्वारे फक्त भांडूप हद्दीमध्ये तथाकथीत भुमाफीयांचा प्रमुख राजेश अमीन यांचेविरूध्द १३ गंभीर गुन्ह्यांचा रेकॉर्ड प्राप्त झाला. तसेच "एस" वॉर्ड मध्ये केलेल्या निवेदनांवर झालेल्या कारवाईविषयी RTI दर्ज केला गेला होता, अशी सर्व कागदपत्रे जोडून मा. उपायुक्त, म.न.पा. परि-६ यांचेकडे आमचे संयुक्तपणे सह्या असणारे तक्रार निवेदन ७ एप्रिल २०१२ मध्ये पाठवले होते. या तक्रार निवेदनावर मुलुंडस्थित सौ. सुषमा मौर्य हिचीही IAC ची सहकारी या नात्याने तिने केलेली सही होती. या दरम्यान तथाकथित भुमाफिया हे माझे घरात येवून किंवा मी जेथे दिसेल तेथे मला भेटुन मागे हटणेसाठी सांगत होते. पैशाचे प्रलोभनही देत होते

(7) यादरम्यान असेही घडले की, तथाकथित भुमाफिया हे त्यावेळी मार्च २०१२ चे दरम्यान चकाला, अंधेरी पूर्व, मुंबई, येथे आमचे IAC चे ऑफीस जे सध्या आम आदमी पार्टीचे ऑफीस आहे तेथे जाऊ लागले व हमीद सरवैयाने IAC नागरिक समितीच्या लेटर हेडवरून त्यांचेविरूध्द मनपामध्ये ज्या तक्रारी केल्या होत्या त्याच्या प्रती या मयांक गांधी, प्रफुल वोरा , नरेश ठाकूर या लोकांना दाखवून मला व हमीद

(36)



सरवैयाला, 'मागे' हटविण्यासाठी त्या लोकांना 'अप्रोच' केले. त्यावेळी तथाकथित भुमाफीया व दुसरे बाजुला आमचे IAC चे नमुद वरिष्ठ असलेले मयांक गांधी, प्रफुल वोरा, नरेश ठाकुर, तसेच प्रीती मेनन, अंजली दमानिया हे IAC हे जबाबदार व्यक्ती यांचे मध्ये आर्थिक किंवा अन्य आधारे "सेटलमेंट" झाली अशी माझी खात्री आहे. या खात्री मागची काही कारणे आहेत. त्यातील एक सुप्त कारण हे कि आमचे IAC चे जनलोकपाल आंदोलन हे एप्रिल २०११ पासून देशातल्या लाखो गरीब व सामान्य पीडीत लोकांच्या दिवस-रात्रीची मेहनत व पैशाच्या आधारावर उभे असलेले आंदोलन होते. पण या आंदोलनाला मुंबई-महाराष्ट्रात चालवणारे व लोकग्रुप बिल्डर्स डायरेक्टर असलेले मयांक गांधी, त्यांचे मित्र असलेले प्रफुल वोरा, आंदोलनात चार महिने उशिराने आलेले श्रीम. अंजली दमानिया, प्रीती मेनन इ. हे सर्व लोक उच्चभ्रु, श्रीमंत व पेज -थ्री वर्गातले लोग हे आमचे आंदोलनाचे सर्वेसर्वा बनले, आंदोलनात विशिष्ट प्रकारचा भेदभाव व मनमानी ठेवू लागले. तसेच यांचेमध्ये काहीतरी संशयास्पद हालचाली या दिसून येत होते. तसेच या सर्वांनाही ही कल्पना होती कि मी एक गरीब घरातुन आलेला, तळागाळात कार्य करणारा बेधडक व त्यागी, मुळ व प्रसिध्द आंदोलनकारी असल्याने मी त्यांना चुकीचे व आक्षेपार्ह काम करण्यास हक्काने सरेआम रोखू शकतो. जे मी वेळोवेळी सार्वजनिक मिटींगमध्ये करायचोही. त्यामुळे त्यांनी तथाकथीत भुमाफियांशी "सेटलमेंट" करणे हे एक सुप्त कारण असण्याची माझी खात्री आहे.

(8) या सेटलमेंट चाच एक भाग म्हणून माझे विरूध्द षडयंत्र रचले गेले व त्यानुसार प्रफुल वोरा यांचे सहीचे IAC चे लेटरहेडवरून " एस " वॉर्डला दि. ९/३/१२ रोजी पाठवले गेले ज्यात 'हमीद सरवैया हा आमचा IAC चा कार्यकर्ताच नाही आहे..' असे चक्क खोटे विधान लिहीले होते. येथे विशेष म्हणजे असे काही पत्र हे 'एस' वॉडने मागवलेले ही नव्हते.

(9) सदर पत्राची प्रत घेऊन तथाकथित भुमाफीया हे विभागात लोकांना दाखवू लागले व असे भासूव लागले की, "देखा, हमने IAC को मॅनेज किया है.." ही बाब मला तेथील एक रहिवाशी श्री. मोहनसिंग बुथा यांनी सांगितली व मी प्रफुल वोरा यांना फोन करून याबाबत विचारले असता प्रथम यांनी गडबडून जाऊन "मी असे

काही पत्र दिले नाही" असे सांगितले. तेव्हा मी व हमीद सरवैया हे IAC हे अंधेरीस्थित ऑफीसला गेलो व प्रत्यक्ष विचारले असता मयांक गांधी व प्रफुल वोरा यांनी सदर पत्र दिल्याचे मान्य केले. या पत्राद्वारे काहीही नकारात्मक गोष्ट घडू शकते हे जाणून मी मयांक गांधी व प्रफुल वोरा याना सदर चुक सुधारण्यास सांगितले व सदर पत्रास रद्दबादल करणारे नवे पत्र हे "एस" वॉर्डला देण्यास सांगितले . पण त्या लोकांनी धुर्तपणे सदर पत्र रद्दबादल करणारे नवे पत्र "एस" वॉर्डला देणेऐवजी दि.१९/३/१२ रोजी मी म्हणजे नितीन चव्हाण, हमीद सरवैया, राजा जोसेफ , मांजलकर इ.हे IAC चे स्थानिय कार्यकर्ता असलेचे पत्र माझे हाती दिले. व या संशयास्पद प्रकरणावर पडदा टाकणेचा प्रयत्न केला. यादरम्यान IAC चे राष्ट्रीय संयोजक अरविंद केजरीवाल हे दि.१३/४/१२ रोजी सांताक्रझ, मुंबई येथे आयोजित IAC च्या मोठ्या मिटींगला आले असता त्यांची माझी भेट झाली. त्यांची माझी पूर्वीही ९ ऑगस्ट २०११ रोजी आझाद मैदानात भेट झाली होती. तदनंतर मी त्यांचे Parivartan व indiaagainstcorruption2010 या ऑफिशियल email id वर आंदोलनात प्रगती होणेसंदर्भात पत्रव्यवहार ही केले होते. दि. १३/४/१२ च्या भेटीमध्येही त्यांचेशी माझी तथाकथित भुमाफियांशी सुरू झालेल्या संघर्षावर चर्चा व एकमत झाले कि, 'जनलोकपाल हा १० किंवा त्याहुन जास्त वर्षांनाही हे आंदोलन चालवून येईल, पण तोपर्यंत आपल्या परीने सनदशीररित्या लोकांसाठी भ्रष्टाचार व माफीयाराज विरूध्द IAC चे माध्यमातून लढले पाहिजे '

(10) यानंतर अत्याचाराची प्रमुख घटना अशी कि दि. १९/४/१२ रोजी सायंकाळी ७.०० चे सुमारास माझ्या विभागातील सचिन गवंडे या इसमाने त्यांचे मोबाईल नं. ९६९९६६२४८७ यावरून माझ्या मोबाईल नं. वर फोन करून सांगितले कि, तथाकथित भुमाफीया, त्यांचा साथीदार जमाल सरवैया हे लोक राजा जोसेफ याला त्याचे घरापासून जबर मारहाण करीत घेऊन चालले आहेत. मी ताबडतोब राजा जोसेफच्या मोबाईल नं. ९०२९६८८८७६ यावर संपर्क केला असता, तो कॉल माझ्या चाळीतील पप्पु यादव याने उचलला व सदर घटनेला दुजोरा देत 'राजाचा मोबाईल हा राजाला मारहाण होत असल्याने माझ्याकडे आहे.' असे सांगितले मी

(38)



हमीद सखैया व काही रहिवाशी हे भांडूप पोलिस ठाणेला पोहोचलो. तेथे आम्ही पाहिले की, राजा जोसेफ हा तेथेच बाकावर बसून होता व त्याचा चेहरा पूर्णपणे सुजलेला होता व त्याला मारणारे तथाकथित भुमाफीया हे त्यांचे भोवती उभे होते. तेव्हा मी तेथे उपस्थित API बनकर यांना प्रथम जखमी राजा जोसेफला मेडीकलसाठी पाठवण्यास सांगितले. यावर त्यांनी मला धक्का मारून पोलिस ठाणेचे बाहेर घालवले. मला यावेळी प्रथमपासूनच भिती होती की, जसे २०११ मध्ये सी.आय.डी.मध्ये स्वतःला धोका असलेची पुर्वकल्पना दिपक सोनी याने देवूनही त्यावर तथाकथीत भुमाफीयांनी PI सांगळे (माझे तक्रारीतील विरोधीपैकी एक ) यांचे मदतीने खंडणीची खोटी केस रचवून त्याला जेलमध्ये डांबले होते. तसेच पुन्हा होऊ नये म्हणून दै. लोकमतचे माझे ओळखीचे पत्रकार अवदुत खराडे जे साध्या दै. पुढारी मध्ये आहेत यांना त्यांच्या मोबाईल नं. ९५९४८८०१६१ यावर कॉल केला . तेव्हा त्यांनी पोलिस उपायुक्त श्री.शिंत्रे यांना कॉल करणेस सांगितले. त्यावेळी श्री शिंत्रे हे भांडूप पोलिस ठाण्यातच दुस-या माळयावर होते तेव्हा मी त्यांना रात्री ८.३० वा SMS केला कि, Sir , V r d members of india against corruption & eager 2 meet u at now, vr out of bhandup police stn. तेव्हा त्यांचा SMS आला कि. - come to office tommarrow at 1 pm. तेव्हा मी त्यांना भांडूप पोलिस ठाणेच्या दुस-या माळयावर भेटलो असता त्यांनी मला दुसरे दिवशी भेटण्यास सांगितले. मी त्यांना पुन्हा SMS केला कि.ok sir, but v just met u at bhandup police station & was immergency. our volunteer is being treated very bad at there now please. तेव्हा त्यांनी SMS केला की, will look into matter.

(11) त्यांनतर API बनकरांनी मला व हमीद सरवैया आत बोलावून आरोपीचे बेंचवर बसविले व तथाकथित भुमाफीयांपैकी एक संकेत जोशीच्या नुसत्या बोलण्यावरून कि त्याचेकडे आम्ही १५०००/- रू. ची खंडणी मागितली असे दाखवून आम्ही दोघाना C.R. No. 150/12, IPC-384,34 या गुन्ह्यामध्ये अटक दाखवली मी पुन्हा श्री. शिंत्रे यांना SMS केला कि, - sir, ur

police r arresting to us also, pl do justice, we r dedicated volunteers of annaji तेव्हा त्याचा SMS आला कि respect law.

(12) मी ऑगस्ट २०११ पासून भांडूप व मुलुंड येथे जनलोकपाल आंदोलनाच्या चौकसभा, चिंतनसभा या अनेकदा पोलिस ठाणेंना पत्रे देऊन घेत होतो. त्यामुळे मी सर्व पोलिसांना सुपारिचित व एक समाजसेवी म्हणून ज्ञात असूनही पोलिसांनी कुख्यात माफीया गुडांसाठी आमचेशी क्रुर वागावे हे माझेसाठी धक्का दायक होते.

(13) त्यानंतर दि. २०/४/२०१२ चे पहाटे १२ ते १चे दरम्यान हमीद सरवैया व मला काही पोलिस पकडून ४थ्या माळयावर PI सांगळे यांच्या केबिनमध्ये घेऊन गेले. तेथे PI सांगळे हे तथाकथित भमाफीया पैकी संकेत जोशी, कार्ल डिसूझा समवेत बसल्याचे मला दिसले मी त्यावेळी पोलिस हे क्रुर व अन्यायाने वागवत असल्याचे निषेधार्थ आदल्या दिवसापासूनच दि. १९/४/१२ च्या सायंकाळपासूनच उपोषण पुकारले होते त्यामुळे उपाशीपोटी मी पुरेसे शुध्दीवरही नव्हतो. हमीद सरवैया निदर्शनानुसार त्यावेळी राजु अमीन, शफी, इद्रीस हे सर्व भुमाफीया साक्षीदारही त्या केबिनजवळ होते. आम्हाला पाहून PI सांगळे हे आई बहिणीवरून शिव्या घालू लागले. त्यांनंतर त्यांनी एकानंतर एक असे आम्हा दोघांना लाथा - बुक्क्यांनी चेहरा पाठ, पायांवर बेदम मारहाण केली. मी त्यांना मारू नका असे विनवत माझा दि. १२/४/१२ रोजी जो रोड अपघात झाला होता, ज्यामुळे माझ्या डाव्या हातावरील जखमेवर इलाज चालू होता, त्याची मेडीकल रिपोर्टही दाखविली. पण यावर भडकून PI सांगळेंनी एकानंतर एक असे आम्हा दोघांना तळहातांवर चक्कीच्या पट्टयाने १५ ते २० मिनटे अमानुष मारहाण केली. माझ्या डाव्या हाताच्या तळहातांवर व डाव्या पायाच्या वरच्या हाडांवर पट्टयाच्या सुमारे २ इंच जाडसर हॅन्डलने पाय फुगेपर्यंत मारले. तसेच धमकी देत होते की, तुम्ही अण्णांची माणसे म्हणून आमची तक्रार करता काय ..... चिरडून टाकू....

(14) त्यानंतर आम्हा दोघांना लॉकअपमध्ये ठेवले गेले व दि. २०/४/१२ च्या दुपारी आम्ही दोघांची मेडीकल करून पोलिसांनी आम्हाला मा. ५३वे कोर्ट, मुलुंड येथे हजर केले. यावेळी मी गेले २० तास उपोषणावर असल्याने पुरेसे शुध्दीवर नव्हतो त्यामुळे

(40)



कोर्टात काही समझु वा बोलू शकलो नाही. पण हमीद सरवैयाने आपले फुगलेले, काळे -निळे हात हे मा. जज मॅडमना दाखवले व 'मारले' असे सांगितले. यावेळी पोलिसांतर्फे मा.कोर्टाला असे भासवण्याचा प्रयत्न गेला कि हमीद सरवैया हा IAC चा कार्यकर्ता नसतांनाही IAC चे लेटरहेडवरून तथाकथीत भुमाफीयांचे विरोधात मनपामध्ये तक्रारी करतो. त्यावेळी मा. कोर्टात त्यांचेतर्फे तेच दि ९/३/१२ रोजीचे प्रफुल वोरा यांनी IAC चे लेटरहेडवरून दिलेले पत्र दाखवणेत आले म्हणजेच सदर पत्र हे फक्त आमचे विरूध्द खोटी केस रचणेसाठीच होते ही खात्री वाटते.

त्यावेळी बहुधा आमचा चांगला व सामाजिक रेकॉर्ड पाहून आम्हाला प्रत्येकी १०,०००/- रू. च्या रोख जमिन देण्यात आला व नंतर आम्हाला मुलंड कोर्टचे लॉकअपमध्ये रवाना केले.

(15) यावेळी प्रीती मेनन, अंजली दमानिया, नरेश ठाकूर हे लोक 'नितीन चव्हाणसाठी आलो'. असे दाखवणेसाठी काही IAC कार्यकर्त्यांसह कोर्टात आले पण ते लोक आम्हाला भेटणेऐवजी किंवा आमचेसाठी वकील इ.मदत करणे ऐवजी चक्क तेथे आम्हास हसणेसाठी व खच्चीकरण करणेसाठी आलेल्या तथाकथित भुमाफियां बरोबर बोलू लागले व त्यानंतर आम्हास तसेच सोडून त्या तथाकथित भुमाफियांसोबत भांडूपमध्ये येवून फिरू लागले. या दरम्यान माझे पत्नीने स्वतःची अंगठी गहाण ठेवून तसेच हमीद सरवैयाचे घरच्यांनी कसेबसे करून सर्वांनी आमचे जामिनाच्या रोख रक्कमेचा बंदोबस्त केला व तो भरुन आम्ही सायंकाळी ७ वाजताचे सुमारास कोर्ट लॉकलपमधून मुक्त झालो.

(16) यानंतरही मयांक गांधी, प्रफुल वोरा, नरेश ठोकूर, प्रीती मेनन, इ. यांचा तथाकथित भुमाफियांच्या हितासाठी व आमचे विरूध्द केलेले षडयंत्राचा भाग हा चालूच राहिला. दि. २१/४/१२ रोजी IAC ची दादर पूर्व येथे हॉलमध्ये मिटींग होती त्यावेळी मयांक गांधी यांनी दि. १९/४/१२ व २०/४/१२ रोजी आपल्या दोन महत्त्वाच्या कार्यकर्त्यांवर म्हणजेच मी व हमीद सरवैयावर झालेल्या पोलिसी अत्याचाराची व खोट्या केसेसची एवढी सर्वात महत्त्वाची बातमी ही उपस्थित इतर कार्यकर्त्यांपासून लपवून ठेवली, तसेच मलाही यावर सर्वासमोर बोलू दिल नाही. ही

संशयास्पद बाब आहे. यामागे आम्हाला मानसिक, नैतिक तसेच कोणत्याही प्रकारे आसरा न मिळून आमचे खच्चीकरण व्हावे हाच यामागील हेतु होता कारण याच मयांक गांधीनी भोळया IAC आंदोलनकर्त्यांना वापरून असिम त्रिवेदी नावाच्या प्रसिध्द कार्टुनिस्टवर पोलिस केस होणे, अरविंद केजरीवालला किंगफिशरच्या प्लेनमधुन उतरविणे या सारख्या साध्या मुद्दयांवरही आंदोलने, नारेबाजी, धरणे इ. केलेले आहेत. आजही प्रिती मेनन ही आम आदमी पार्टीचीं नेता बनून बरून कश्यप सारखे हायर क्लास पेज- थ्री लोकांसाठी गरज नसतानाही पोलिसांसमोर आंदोलने करते. त्यामुळे हा विरोधाभास लक्षणीय वाटतो.

(17) तसेच दि. २४/४/१२ रोजीच्या IAC च्या अंधेरीस्थित ऑफीसमधील सार्वजनिक मिटींगमध्येही दि. २१/४/१२ च्या मिटींगमध्ये जे केले तसेच केले व सदर घटना ही लपवून ठेवली. त्याचवेळी तथाकथित भुमाफीया व प्रीती मेनन यांची दुस-या केबिनमध्ये पुन्हा एकदा मिटींग झाली होती. त्यावेळी प्रीती मेनन ही मुद्दाम माझे समोर मयांक गांधी यांना सांगू लागली कि, 'वे तो रवि पुजारी गँग के लोग है.... उनसे हमे दुर रहना चाहिये.....' यावेळी मयांक गांधी नरेश ठाकुर या लोकांनी माझेवर दबाव टाकला कि नितीन, वे लोग मान रहे है कि हमने आपके लोगों को झुठा केस में फसाया है और वे लोग माफी मांग रहे है, सो तुम भी बात को भुल जाओ...' ही आक्षेपार्ह बाब आहे.

यानंतरही तथाकथीत भुमाफीयांनी चक्क स्वतःच्या बेकायदेशिर कामांचा तपशिलही सहीनिशी आय.ए.सी. च्या नावे दि.२६/४/१२ रोजी दिला होता व त्यात आमचेकडून काही चुक झाल्यास माफ करावे.' अशा आशयाचे विधानही लिहीले होते. आम्हावरील पोलिसी अत्याचाराची व खोट्या केसेसची खातरजमा करून दै.लोकमत ने दि.२८/४/१२ रोजी सदर बातमी आपल्या वृत्तपत्रात प्रसिध्द केली. पण तरीही त्याचदिवशी नानावटी हॉल पार्ले येथील IAC च्या सार्वजनिक मिटींगमध्ये मयांक गांधी, नरेश ठाकूर, मयांक जैन इ. लोकांनी मला बोलू दिले नाही व बातमी इतरांपासून लपवून ठेवली, ही बाब संशयास्पद आहे.

(18) यादरम्यान 'मयांक गांधी व प्रफल वोरा यांनी दिलेल्या खोट्या पत्रामुळे भ्रष्टाचाराविरोधी लढणा-या कार्यकत्यांवर कशा खोट्या केसेस व अत्याचार होतात'

(42)



हे मी खुलेआम बोलू लागलो. त्यामुळे स्वतःची चुक ही झाकण्यासाठी मयांक गांधी, प्रफुल वोरा यांनी दि. ९/३/१२ रोजी IAC च्या लेटरहेडद्वारे जे पत्र "एस" वॉर्डला दिले होते, जे आमचेविरूध्द खोटी केस बनणेस वापरले गेले व आम्ही मार्च २०१२ मध्येच हे पत्र रद्दबादल करणारे नवीन पत्र 'एस' वॉर्डला पाठवा असे वारंवार मयांक गांधी, प्रफुल वोरा यांना सांगितले होते, त्या पत्राला रद्दबादल करणारे "एस" वॉर्डचे नावे नवीन पत्र हे IAC च्या लेटरहेडद्वारे मयांक गांधी, प्रफुल वोरा यांनी नरेश ठाकूर याची त्यावर सही घेऊन माझेकडे दि. २४/५/१२ रोजी दिले. ज्यामध्ये असे दिले कि -'पहिल्या पत्रात आमची चुक झाली...हमीद सरवैया हा आमचाच कार्यकर्ता आहे...' म्हणजेच पहिले खोटी केस होणेसाठी पुरक असे पत्र देणे त्यावर आम्ही सांगूनही त्यावेळी त्या पत्राला मागे

घेणारे पत्र न देणे व नंतर खोटी केस व अत्याचार झाल्यानंतर मग त्या पत्राला मागे घेणारे व पहिलेवाले पत्र हे चुकीने दिले असे सांगणारे पत्र देणे हे मयांक गांधी, प्रफुल वोरा, नरेश ठाकूर इ. लोकांचे वागणे हे माझ्या आरोपांना पुष्टी देणारे आहेत.

(19) यादरम्यानची आणखी एक संशयास्पद घटना ही कि, तथाकथीत भुमाफीयांनी विभागातील नागरीक श्री.गायकवाड व श्री.गुप्ता यांना जागा खाली करणेसाठी कसा सर्वप्रकारे त्रास दिला त्याच्या त्या लोकांनी केलेल्या तक्रारीही मी प्रथमपासूनच मयांक गांधी , प्रफुल वोरा, नरेश ठाकूर यांना दाखवत आलो होता. पण अशा पीडीतांना भेटायचे सोडून नरेश ठाकूर दुस-यांदा म्हणजे दि. २५/५/२०१२ रोजी रात्री ११.वा तथाकथित भुमाफीयांच्याच मोटरसायकलवर बसून त्यांचेसोबत भांडूपमध्ये फिरताना मला व इतर रहिवाश्यांना दिसले. ही गोष्ट स्वतः नरेश ठाकूर यांनीही मान्य केलेली आहे. तसेच त्याचवेळी रात्री उशिरा नरेश ठाकूर याने हमीद सरवैयाचे घरी जाऊन त्याच्या कुटूंबियांना घाबरवण्याचा प्रयत्न हे सांगून केला कि -"हमे आपके बेटे की जान की फिक्र है इसलिये हम हमीद को "पिछे" हटणे को बोल रहे है सो आप भी समझावो उसे.."

(20) यानंतर दि.१३/६/१२ रोजी मी कामावरी असल्याने उपलब्ध नाही हे माहीत असूनही नरेश ठाकूर , प्रिती मेनन , सुषमा मौर्य यांनी मनोहर घनशारामणीसारख्या इतर मुलुंडस्थित IAC कार्यकर्त्यांना बोलवून माझी समजुत काढायची आहे असे

(43)



दाखवून मुलूंडमध्ये मिटींग घेतली व त्यात उलट माझेच चारित्र्यहनन करणे हेतु व तथाकथीत भुमाफीया हे कसे चांगले आहेत हे दाखवणे हेतु खोटे बोलले कि- "नितीन विरध्द आमच्याकडे पुरावे आहेत.." पण नंतर घनशरामाणींकडून ही बाब समझल्यावर मी याबाबत नरेश ठाकूर , प्रिती मेनन , सुषमा मौर्य यांना जाब विचारला असता त्यांनी उत्तर देण्याचे टाळले.

त्यानंतरही २०/६/१२ रोजी नरेश ठाकूर ने देशाला वाचवण्याचे आवाहन करुन २५ जुलै २०१२ च्या अरविंद केजरीवाल यांच्या आंदोलनात मी व माझे सहका-यांनी सहकार्य करावा असा SMS पाठवला. जर माझ्याविरुध्द काही पुरावे होते तर मग हा SMS कशाला हा प्रश्न आहे.

(21) यानंतर पुन्हा दि.११/८/१२ रोजी नानावटी हॉल, पार्ले येथे होणा-या IAC च्या साप्ताहीक सभेमध्ये सुमारे ७० ते १०० IAC कार्यकर्त्यांसमोर नरेश ठाकूर ने भाषण केले कि -नितीन चव्हाण ने IAC के नाम पर १५,००० रु. जमा किये और उसकी हम पुलिस में शिकायत करने पर सोच रहे है.." पण नंतर याच नरेश ठाकूर ने पुन्हा १२/१०/१२ व १३/१०/१२ रोजी मला सलमान खुर्शीद विरोधी आंदोलनामध्ये येण्याचे SMS पाठविले याचाच अर्थ नरेश ठाकूर हा मिटींगमध्ये माझेविरुध्द चक्क खोटे बोलून माझे खच्चीकरण व तथाकथीत भुनाफीयांचे एक प्रकारे उदात्तीकरण करत होता. यांच्याबरोबर असणारे दिनकर जोशीही हेच काम करत होते. दिनकर जोशी हे या IAC च्या वरिष्ठ लोकांमध्ये व तथाकथीत भुमाफीयांमध्ये बोलणी करणे, भुमाफीयांच्या संपर्कात राहणे, त्यांना भेटणे हेही काम करत असल्याचे मला काही लोकांकडून समझले.

(22) यादरम्यान दि. १८/८/१२ व पुन्हा दि.३०/८/१२ रोजी इथपर्यंतचा सर्व नभुद प्रकार ज्यामध्ये मयांक गांधी , प्रफुल वोरा, नरेश ठाकूर इ. लोक हे भुमाफीयांसाठी त्यांचेशी लढणा-या इतर IAC कार्यकर्त्यांना कसे षडयंत्र करुन खोटया केसेस दाखल व्हावेत असे कृती करतात हे सर्व सिध्द होणारे पत्र अरविंद केजरीवाल यांना त्यांचे ई-मेल आय.डी. वर पाठवले व त्यांचा कौशांबी , उत्तर प्रदेश येथे असलेल्या ऑफीसमध्ये तसेच त्यांचा स्वतः चा तत्कालीन मोबाईल क्र. ९८६८२१९४८६ वर

(44)



सतत याबाबत संपर्क चालू ठेवला. तेव्हा दोन्ही क्रमांकावर केलेल्या बातचीतमध्ये माझ्या तक्रारीवर कारवाई करण्याचे आश्वासन हे नेहमी मिळायचे.

(23) तसेच दि.२५/८/१२ रोजीही अरविंद केजरीवाल यांना पाठवलेल्या पत्रांच्या प्रती या मी, माझी पत्नी व आमचे सहकारी असे १५-१७ जणांनी नानावटी हॉल, पार्ले येथील मिटींगच्या वेळी इतर कार्यकर्त्यांना वाटले. त्यावेळीही मयांक गांधी यांनी मिटींगमध्ये या पत्राबाबत मौन पाळले. म्हणजेच माझे यांचे तथाकथीत भुमाफीयांबरोबरचे संबंधाचे आरोप हे सत्य होते.

(24) यानंतर दि.२६/९/१२ रोजी अरविंद केजरीवाल हे अंजली दमानियांसोबत सिंचन घोटाळयासंबंधी प्रेस कॉन्फरन्स घेणे हेतू मुंबईला आले असता ते जातेवेळीही सहार विमानतळावर मी अरविंद केजरीवाल यांना दिड महीने उलटून गेल्यावरही मी पाठवलेल्या पत्रावर काहीच कारवाई न झाल्याबद्दल विचारले असता त्यांनी सर्वांसमोर मला थोडयाच दिवसात कारवाई करणेचे आश्वासन दिले. यावेळी मी अरविंद क्रेजरीवाल यांना प्रश्न विचारु नये म्हणून त्यांच्या कार्यकर्त्यांनी मला व विशेषतः माझ्या सोबत असलेल्या श्रीम. ॲनी कोहली यांना धक्काबुक्कीही केली होती.

(25) यादरम्यान असेही समझले कि दि. ९/९/१२ रोजी मुलूंड मध्ये मयांक गांधी, नरेश ठाकूर , सुषमा मौर्य, दिनकर जोशी यांनी आयोजित केलेल्या IACच्या मिटींग मध्ये तथाकथित भुमाफीयांपैकी संकेत जोशी, जो आमचे विरूध्द खोट्या केसमध्ये फिर्यादी म्हणून आहे तो व कार्ल डिसूझा हेही होते. ही सुध्दा संशयास्पद बाब आहे.

(26) त्यानंतर दि. २०/१२/२०१२ रोजी मयांक गांधी, प्रफल वोरा, यांनी बनवलेला आम आदमी पार्टीच्या लेटरहेडवरील खोटा तक्रार अर्ज हा प्रिती मेनन यांनी भांडूप पोलिस स्टेशनला येवून दिला ज्यात असे होते कि- मी व आणखी IAC चे एक सदस्य, ज्येष्ठ वृध्द नागरिक घनशारामाणीजी यांनी अनुक्रमे दि. २३/११/१२ व ०२/११/१२ रोजी IAC च्या मिटींगमध्ये येवून गुंडागर्दी केली. या पत्रात हेही खोटे लिहीले कि आम्ही IAC ची कार्यक्रम घेत होतो. कारण त्यावेळी IACमध्ये हे

(45)



लोक नव्हतेच, हे लोक आम आदमी पार्टीत होते. म्हणजेच तथाकथीत भुमाफियांचे क्रुर कृत्यांविरूध्द निषेधही न करणारे, त्यांचे विरूध्द एकही पत्रव्यवहार किंवा तक्रार न करणारे प्रफुल वोरा हे आमचे विरूध्द त्याच पोलिस स्टेशनला खोटे तक्रार अर्ज देतात ही संशयास्पद बाब आहे. सदर खोटा तक्रार अर्ज पाठवल्याबद्दल मी व धनशारामाणी यांनी प्रफुल वोरा यांना नंतर कायदेशिर नोटीसही दि. ३०/३/१३ रोजी पाठवली होती. तसेच भांडूप पोलिस ठाणेला तक्रारही केली होती.

याच प्रफुल वोरांबाबत सशंयास्पद बाब ही होती की, आमचेवर एवढी गंभीर केस व अत्याचार होऊनही त्यांनी आम्हाला विचारपूस करणारा एकही कॉल हा कधी केलेला नव्हता.

(27) दुसरीकडे, आमचेवर खोटी केस व मारहाण होणेपूर्वी पासून ते नंतरपर्यंत पोलिसांचे वागणे हे केस आक्षेपार्ह व संशयास्पद होते ते असे कि,

आमचेवर दि. १९/४/१२ रोजी खोटी केस व मारहाण झालेनंतर मी व हमीद सरवैया दोघांनीही मा.पोलिस आयुक्त व उपायुक्त यांना तथ्यांसह तक्रार अर्ज दिले तरीही दि. २४/४/१२ च्या माझ्या तक्रार अर्जावर पोलिस विभागाकडून उच्चस्तरावर काहीच चौकशी झाली नाही. सदर तक्रारीमध्ये महत्त्वपूर्ण भुमिका असलेल्या राजा जोसेफ, श्री. अवधुत खराटे(पत्रकार ) श्री. शिंत्रे साहेब, तत्कालिन पोलिस उपआयुक्त यांचे तसेच तथाकथीत भुमाफियांपैकी राजेश अमीन तसेच तेव्हाचे IAC चे कोणत्याही व्यक्तीचा जबाब घेतलेले नाहीत.

तथाकथीत भुमाफियांपैकी राजेश अमीन व त्यांचा नमूद केलेला साक्षीदार जमाल सरवैया यांचे गंभीर व संघटीत गुन्हे असेलेला रेकॉर्डही मी दर्शवलेला होता.

माझ्यावर खोटी केस होण्यापूर्वी सन २०११ मध्ये दिपक सोनी या तथाकथीत भुमाफिया विरोधात तक्रारी करणा-या तक्रारदारावर सदर भुमाफीया व तेच PI सांगळे यांनी बनावटी व हास्यास्पद वाटेल अशी केस रचली आहे. यामध्ये दिपक सोनीने त्याच्यावर खोटी केस होण्याच्या आधीच त्या षडयंत्राची माहिती दिनांक ९/२/२०११ रोजी मुंबई सी.आय.डी. मध्ये लेखी दिली होती. तसेच या केसमध्ये अनेक गंभीर गुन्हे असलेले राजेश अमीन, संकेत जोशी,कार्ल डिसूझा, संकेत

46



जोशीचा भाऊ केयुर जोशी हेच सर्व आपसात फिर्यादी, पंच व साक्षीदार बनवले गेले आहेत. या केसमध्ये राजेश अमीन पंच म्हणून आहे ती वेळ आहे दिनांक २३/२/२०११ रोजीचे ००.५० ते २.०० वाजतापर्यंत पण याच राजेश अमीनाविरुध्द त्याच पोलीस ठाण्यात दिनांक २२/२/२०११ रोजी सायंकाळी ६.१५ वाजता म्हणजे पंच बनवण्याचा सहा तास अगोदर एक गंभीर एन.सी. ची नोंद आहे ज्यामध्ये पोलीसांनी समोरील फिर्यादीला राजू अमीन सापडत नसल्याचेही सांगितले आहे,यांची नोंद घेण्यात यावी.

28) माझ्या विरुध्द दि. १९/४/२०१२ रोजी झालेल्या केसमध्ये फिर्यादी असलेल्या तथाकथीत भुमाफिया संकेत जोशीने नमुद केले कि-दिपक सोनी ने सन २०१० मध्ये हप्ता मागितला म्हणून त्यावर केस दर्ज आहे, त्यावेळी मी (म्हणजे संकेत जोशीने) दोन वेळा त्याला रु.२५,०००/- दिले आहेत. पण दिपक सोनी विरुध्द झालेल्या केसमध्ये साक्षीदार असलेल्या याच संकेत जोशीने ही महत्वाची बाब कुठेही नोंद केलेली नाही. ही विरोधाभासी बाब आहे.

29) मार्च २०१२ मध्ये हमीद सरवैयाने पोलिसांना तथाकथीत भुमाफियांविरुध्द धमक्या देणा-या लेखी तक्रारी देऊनही दि. ९/३/१२ रोजी विरोधीं विरुध्द तक्रार दाखल करणे ऐवजी त्यांचे व त्यांचे साथीदार जमाल सरवैया यांच्या फक्त जबानी घेतल्या गेल्या. या जबानीमध्ये भुमाफियांनी नमुद केले कि- हमीद सरवैया हा IAC चा सदस्य असून हप्ता मागतो पण आमच्यावर दि.१९/४/१२ रोजी दाखल झालेल्या गुन्ह्यात संकेत जोशीने आपल्या जबाबात हमीद सरवैयाला दिपक सोनीचा साथीदार दाखवले आहे तसेच दि.९/३/१२ रोजीच्या भुमाफीयांच्या "हमीद आमच्याकडून हप्ता मांगतो "या जबानीवर त्यावेळी पोलिसांनी हमीद सरवैयाची चौकशी का केली नाही. हा प्रश्न आहे. नंतर ४० दिवसांनी त्याचे व माझेविरुध्द नमुद केस का दाखल करण्यात आली हा प्रश्न आहे.

तसेच तथाकथित भुमाफीयांनी दि. ९/३/१२ रोजी दिलेल्या जबानीमध्ये माझे कुठेच नाव घेतले नव्हते पण भुमाफीयांनी आपल्या २३/६/१२ व २६/६/१२ च्या त्यांच्या जबानीमध्ये म्हटले आहे कि, नितिन चव्हाण म्हणजे मी व हमीद सरवैया हे आमच्या बेकायदेशीर बांधकामाची तक्रार मनपा, पोलिस तसेच श्री.अण्णा हजारे यांचेकडून

47



करण्याची धमकी देऊन पैसे मागायचे ... घाबरुन आम्ही त्यांना कित्येक वेळा ५००/- ते १०००/- रु दिले आहेत. हा काय साक्षींमधला विरोधाभास आहे हे चौकशी करणे जोगे आहे.

30) माझेविरुध्द असलेल्या चार्जशीटमध्ये अंतिम दोषारोपमध्ये आम्ही १५,०००/- रु. खंडणी मागीतली असे दाखवले आहे पण त्याच एफ.आय.आर. मध्ये फिर्यादी असलेल्या भुमाफीया संकेत जोशीने नमुद केलेय कि आम्ही त्याच्या एक बांधकामाचे १५,०००/- रु. या हिशोबाने त्याचे दोन बांधकामाचे पैसे मागीतले आहे . या हिशोबाने खंडणीची रक्कम ३०,०००/- रु. होते. हा विरोधाभासही चौकशी करणेजोगे आहे.

31) आमच्यावर खोटी केस झाल्यानंतरही भुमाफीया संकेत जोशी व कार्ल डिसूझा हे आम्हाला "मागे" हटण्यास सांगणेसाठी माझ्या व हमीद सरवैया याच्या मागे जेव्हा म.न.पा.उपआयुक्त कार्यालय, घाटकोपर पर्यंत आले. ती घटना दि.२५/६/१२ रोजीची होती. तेव्हा त्यांनी मला दोनदा कार्ल डिसूझाचे मोबाईलवरुन कॉलही केले होते. त्याचीही लेखी तक्रार मी. दि. २६/६/१२ रोजी पोलिस उपायुक्त यांना देऊनही यावर पोलिसांकडून काहीच कारवाई झालेली नाही ही बाब चौकशीजोगे आहे.

32) आमच्यावर पोलिसी अत्याचार झाल्यावर मी व हमीद सरवैया याने स्वतंत्रपणे मा. पोलिस आयुक्त व उपायुक्त यांकडे PI सांगळे व भुमाफीया यांच्याविरुध्द तक्रार केली होती . पण त्या तक्रारअर्जावर त्याच PI सांगळेंना तपास अधिकारी बनवले गेले ही बाब ही चौकशीमागे आहे दि.२७/४/१५ रोजी माझ्याविरुध्द केसमधील फिर्यादी तथाकथित भुमाफिया संकेत जोशी याने मा.५३ वे कोर्टात जी जबानी दिली त्यानंतर आजपर्यंत एकाही तारखेला तो आलेला नाही. कारण त्याचे जबानीत भरपूर असत्य व विरोधाभास असून ते उलटतपासणीत मा.कोर्टासमोर उघड होईल हीच त्याला भीती असावी.

33) एकूणच हे सर्व तथाकथीत भुमाफिया, भ्रष्ट पोलिस अधिकारी व तत्कालीन IAC चे व सध्याचे आम आदमी पार्टीचे नमुद नेते यांचे संगनमताने व षड्यंत्राने आतापर्यंत येथे नमूद केलेल्या असत्य अत्याचाराच्या घटना घडल्यामुळे तसेच पोलिस

(48)



ठाणेत झालेल्या अमानुष मारहाणीमुळे मला व माझ्या कुटुंबाला प्रचंड मानसिक धक्का बसला. तसेच माझे मानसिक, आर्थिक व व्यवसायिक जीवनच उध्वस्त झाले. तसेच पोलिस अत्याचारात दुखावलेला माझा डावा हात हा अजूनही पुर्णपणे बरा न झाल्यामुळे माझा व्यवसायही मंद होऊन पहिल्यापेक्षाही हालाखीचे जीवन जगावे लागले. अशा एकूण टेन्शनमध्ये मी रात्रीचे नीटपणे झोपत नसायचो तसेच रात्री ३-४ लाही झोपेतुन उठून घराबाहेर जाऊन चालायचो. या सर्व मनस्तापामुळे व भीतीमुळे माझी पत्नी अर्चना ही गर्भावस्थेत असताना हायपर टेन्शनमुळे ऑक्टोबर २०१२ मध्ये १० दिवसांसाठी जे.जे.रुग्णालयात भरती होती. यावर चांगल्या प्रकारे इलाज करणे इतपत माझी आर्थिक स्थितीही या घटनाक्रमांमुळे राहीली नव्हती. पुढे दुर्दैवाने दि. १/३/१३ रोजी आमचे ७ महिन्याचे मुल हे दगावले . यामुळे मी मानसिकदृष्ट्या पुर्णपणे उध्वस्त व व्यथित झालो व इथपर्यंतच्या घटनाक्रमांना जोडून पुन्हा एक तक्रारअर्ज हा पोलिस विभागाला व मा. राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाकडे एप्रिल २०१३ मध्ये केला. यामध्ये प्रत्यक्ष सहभाग दिसून येणारे PI सांगळे , API बनकर, हे पोलिस राजेश अमीन, संकेत जोशी, कार्ल डिसूझा , हे तथाकथीत भुमाफिया तसेच मयांक गांधी , प्रफुल वोरा, नरेश ठाकूर, दिनकर जोशी, सुषमा मौर्य हे आम आदमी पार्टीचे लोक यांची विरोधी म्हणून नावे होती व मागणी होती कि पुर्णपणे नमूद घटनेची चौकशी होऊन अजूनही कोणी दोषी वाटत असल्यास त्यासही गृहीत धरावे व पुर्णपणे दोषींवर कारवाई होऊन न्याय मिळावा.

(34) त्यानंतर सदर अर्जानुसार मा.राष्ट्रीय मानव हक्क आयोगाचे निर्देशानुसार स्थानिक पोलिसांकडेच पुन्हा हे प्रकरण तपासणीसाठी आले व त्यानुसार जेव्हा त्यांनी आम आदमी पार्टीचे नमुद लोकांना बोलावले तेव्हा त्यांनी हजर राहणेऐवजी वक्क पुन्हा आम आदमी पार्टीचे लेटरहेडवरुन खोटे पत्र पाठविले कि- 'नितिन चव्हाण हा फक्त IAC चे काही मिटींगला यायचा याव्यतिरिक्त आम्ही त्याला ओळखत नाही....' सध्या मा. राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाने पुन्हा हे प्रकरण राज्य सी.आय.डी.कडे नोव्हेंबर २०१४ मध्ये पाठवले व त्यावर राज्य सी.आय.डी.द्वारा चौकशी होऊन सध्या चौकशी अहवाल हा मा. राष्ट्रीय मानवहक्क आयोगाकडे गेल्याचे समजते ज्याची प्रत ही मला अर्ज व प्रयत्न करूनही मिळालेली नाही आहे.

यादरम्यान , सन २०१३ मध्ये दिल्लीमध्ये निवडणुकीचे वातावरण असताना मी पुन्हा एकदा अरविंद केजरीवाल यांना IAC नागरीक समितीचे लेटरहेडवरुन दि.१/११/१३ रोजी पत्र पाठविले ज्यामध्ये मी त्यांना दि.१८/८/१२ , ३०/८/१२ रोजी ई-मेलद्वारे पाठविलेल्या पत्रावर, अंजली दमानिया यांचे जमीन घोटाळयाबद्दल व प्रत्यक्ष त्यांनी दि. २६/९/१२ रोजी मुंबई एयरपोर्टवर दिलेल्या आश्वासनावर काहीच कारवाई न केल्याबद्दल जाब विचारला तसेच कसे जनलोकपाल आंदोलनाच्या पैशाचा व सामग्रीचा वापर हा त्यांचे पक्षासाठी होतोय याचाही जाब विचारला होता. त्यानंतर नोव्हेंबर २०१३ मध्ये सर्व राष्ट्रीय न्युज चॅनल्सवर एक व्हिडीओ वारंवार दाखवली जाऊ लागली ज्यामध्ये श्री. अण्णा हजारे हे माझ्याशी बोलतात कि - " मेरे नाम से ३ करोड लोगो ने चंदा दिया वो सब पार्टी के लिए इस्तेमाल हो रहे है..." या गोष्टीमुळे त्यावेळी अरविंद केजरीवाल व त्यांचे आम आदमी पार्टीची मोठी पोलखोल झाली होती व या सर्व व्यक्तींचा माझेवर रागही आला. त्यानंतर चिडून जाऊन या सर्वांनी मला अधिकच त्रास देण्याचे ठरविले . त्याच्याच भाग म्हणून अरविंद केजरीवाल यांचे मर्जीनुसार त्यांचे पार्टीचे प्रवक्ते कुमार विश्वास यांनी द.२०/११/२०१३ रोजी इंडीया टी.व्ही. या न्युज चॅनलवर एका डिबेट कार्यक्रमात सदर व्हिडीओवर भाष्य करताना माझेविरध्द विधान केले कि - ये नितिन चव्हाण है, एक्स्टॉर्शन केस में ये गिरफतार थे...."

(35) मी एप्रिल २०११ पासून जनलोकपाल आंदोलनाचा प्रचारक होतो. स्वतः चा घर -रोजगार सोडून स्वखर्चाने आंदोलनाचे पुर्ण वेळ कार्य करत होतो हे सर्व अरविंद केजरीवाल यांना माहीत होते तसेच दि.१८/८/२०१२, ३०/८/२०१२ रोजी ईमेल ने पाठवलेल्या पत्रांमुळे, सततच्या माझ्या फोनवरील पाठपुराव्यामुळे , प्रत्यक्ष भेटींमुळे त्यांना माहित होते कि कसे त्यांच्याच नमुद माणसांनी भुमाफियांशी साठ गाठ ठेवून माझ्यावर खोटी केस घडवली आहे. एकीकडे संपुर्ण देशासमोर , मीडीयासमोर भ्रष्टाचाराविरध्द लढण्याचे व त्याग करण्याचे भाषणे करणा-या अरविंद केजरीवाल यांना त्याचवेळी माझ्या तक्रारींवर कारवाई करणे भाग असतानाही त्यांनी उलट आपल्याच दोषी लोकांना पाठीशीच घातले ज्यामुळे माझ्यावर होणारी अत्याचारांची व अन्यायांची मालिका ही थांबलीच नाही , ज्याची परिणीती ही माझे ७ महिनेचे मुलगी दगावणे इतपत झाले.व तरीही उलट माझ्याविरध्द एका न्युज चॅनल्सवर असे विधान

(50)



आपल्या प्रवक्त्यामार्फत करायला लावणे म्हणजे हे माझे पुर्णपणे खच्चीकरण करुन आत्महत्येस प्रवृत्त करण्याचा अरविंद केजरीवाल व कुमार विश्वास यांचा डाव दिसून येतो. न्युज चॅनल्सवर ब्रॉडकास्ट होण-या या व्हिडीओत अरविंद केजरीवालची पोलखोल करणारे सदर व्यक्तव्य हे स्वतः अण्णाच करताहेत मग ते ऐकणा-या माझ्याविरुध्द बोलण्याची गरजच काय हा प्रश्न आहे.

(36) यानंतरही जेव्हा श्री. अण्णा हजारे हे डिसेंबर २०१३ रोजी राळेगणसिध्दी येथे जनलोकपालच्या मागणीसाठी उपोषणाला बसले तेव्हा तिथे मी व माझी पत्नीही होती . तेव्हा तिथे आम्हाला कुमार विश्वास दिसले. तेव्हा तिथे मी त्यांना माझेविरुध्द मीडीयात एकतर्फी बदनामी करणेविरुध्द जाब विचारला व तेथेच सर्वासमोर हट्ट धरला कि या कुमार विश्वास मीडीयासमोर माझ्याशी डिबेटला बसावे व यामध्ये मी हे आम आदमी पार्टीचे लोक कसे लॅंडमाफीयासाठी स्वतःच्या कार्यकर्त्यांना खोटया पोलीस केसमध्ये अडकवतात व यांच्या पार्टीची अंजली दमानिया ही कशी शेतक-यांच्या जमिनी स्वस्तात घेऊन त्यांना विकण्याचा भ्रष्ट व्यवसाय करते हे साबीत करतो. माझा हा हट्ट व कुमार विश्वास चे काही कार्यकर्ते हे मला धक्काबुक्की करतानाचे पाहून कुमार विश्वास , अंजली दमानिया, प्रीती मेनन , मयांक गांधी इ. लोकांनी त्या जागेतून पलायन केले. ही पलायनची न्युजही दुस-या दिवशी सर्व वृत्तपत्रात आली होती.

(37) याव्यतिरिक्त अंजली दमानिया या जेव्हा एप्रिल २०१४ मध्ये लोकसभा उमेदवार म्हणून नागपुरमध्ये उभ्या राहिल्या तेव्हा मी नागपुरमध्ये जाऊन त्यांचे कर्जतमधील जमीन घोटाळयाची पोलखोल करणारी प्रेस कॉन्फरंस घेतली, प्रिती मेनन यांना त्याच काळात मुंबई, मरीन ड्राईव येथील इलेक्शन एक्सप्रेस या 'आजतक' संयोजित कार्यक्रमात भांडूपमधील लॅंडमाफीयांना साथ दिल्याबद्दल सरेआम प्रश्न विचारले, त्यानंतर एकदा अरविंद केजरीवाल हे पुन्हा वरळी, मुंबई येथे आले असता, त्यांचे समोर पुन्हा उभे राहुन नमुद प्रकरणी प्रश्न विचारू केले पण या सर्व ठिकाणी हे लोक पलायन करायचे हे विशेष.

(38) यानंतरही माझ्यावर राग म्हणून यावेळी जुन २०१४ मध्ये आम आदमी पार्टीच्या या नमुद लोकांनी स्वतःच्या लेटरहेडवरुन तक्रार न बनवता यांचे पार्टीशी

(51)



कुर्ल्यातील एक वकील फिरोज शेख यांनी त्याच्या लेटरहेडवरुन माझी पुन्हा त्याच भांडूप पोलीस स्टेशनात तक्रार पाठविली कि मी कोणा महीलेची छेडही काढतो, तिला शिव्याही देतो व खंडणीही मागतो. यामध्ये कोणती बाई हिचा काहीच तपशील नाही. मी याही खोटी तक्रार करणे विरूध्द भांडूप पोलिस ठाणेला चौकशी नाही. मी याही खोटी तक्रार करणे विरूध्द भांडूप पोलिस ठाणेला चौकशी व फौजदारी कारवाई करणेसाठी तक्रार अर्ज केला होता ज्यावर नेहमीप्रमाणे काहीच ठोस कारवाई झाली नाही.

इथवर माझे कथन पूर्ण करून माझे म्हणणे हे कि मी आजतोपर्यंत याप्रकरणी संपूर्ण सत्य बाहेर येणेसाठी व संपूर्ण न्यायासाठी अत्यंत दयनीय हालामध्ये व मानसिकतेमध्ये सनदशिररित्या लढत आहे.

दि. 26/10/2016

नितिन ब. चव्हाण

* [आज मला सोबतीतील कुणीही हे "फितुर" झालेले असलेस त्याची काही गॅरंटी नाही ! ]